# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८

# आरोग्य मुख्य कार्यालय

## मॅन्युअल क्र.३

## निर्णय प्रक्रियेसाठी अनुसरली जाणारी पद्धत पर्यवेक्षण आणि जबाबदारी.

# कलम ४ (१)(B) (III)

निर्णय घेण्याच्या प्रकियेची कार्यपध्दती, पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली/प्रकाशन

आरोग्य विभागाचे कामकाज हे अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह य़ा आरोग्य विभागाच्या प्रभाग कार्यालयामार्फत चालते. या प्रभाग कार्यक्षेत्रातील रस्ते साफसफाई, कचरा उचलणे, गटर्स तुंबणे व भरून वाहणे यांची साफसफाई करणे, डास प्रतिबंधक उपाययोजना, कचरा कुंडीतील कचरा हलविणे, नदीपात्रातील जलपर्णी काढणे, नागरिकांमध्ये जनजागरण करणे या कामाची पाहणी करणे व त्यामध्ये सुधारणा करणेकामी आदेश देणे. आरोग्य विषयक कामाबाबत धोरण ठरविणे व त्याचे अंमलबजावणीसाठी प्रभाग कार्यालयास निर्देश देणे. सदर कामकाजाशी संबंधित लिपिकाकडे संदर्भ प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करून नस्ती मुख्य लिपिक, सहा. आरोग्याधिकारी, आरोग्य कार्यकारी अधिकारी व आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा. अति आयुक्त, मा. आयुक्त यांचेकडे सादर केली जाते व त्यावर निर्णय घेण्यात येतो. अशी पर्यवेक्षण व उत्तरदायित्व प्रणाली अस्तित्वात आहे.